/-

**भारतरत्न पं. भीमसेन जोशी युवा शिष्यवृत्ती**
**योजनेअंतर्गत अर्जांच्या छाननी बाबतचे निकष**

**महाराष्ट्र शासन**
**पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग**
**मादाम कामा रोड, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२**
**शासन निर्णय क्र. शासप्रो ४४१३-१/युशियो/प्र.क्र. १२६/सां.का.४**
**दिनांक : ३ ऑगस्ट, २०१३**

**प्रस्तावना :-** दि. ३० जानेवारी, २०१३ च्या शासन निर्णयान्वये भारतरत्न पं. भीमसेन जोशी शास्त्रीय संगीत प्रोत्साहन योजना ही नव्याने सुरु करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत एकूण ४ उपक्रम राबविण्यात येणार असून त्यामध्ये शास्त्रीय संगीतामध्ये शिक्षण घेणा-या हुशार व गरजू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देवून त्याच्याँ कलेच्या शिक्षणास मदत करण्यासाठी भारतरत्न पं. भीमसेन जोशी युवा शिष्यवृत्ती हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. युवा शिष्यवृत्ती उपक्रमांतर्गत शास्त्रीय संगीताच्या शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यासाठी अंमलात आणावयाची कार्यपध्दती दि. ३० जानेवारी, २०१३ च्या शासन निर्णयात नमूद करण्यात आली आहे. सदर कार्यपध्दतीनुसार युवा शिष्यवृत्ती उपक्रमाची प्रत्यक्ष अंमलबजावणी सन २०१३-१४ या चालू आर्थिक वर्षी सुरु करण्यात आली. प्रथम याप्रकरणी वृत्तपत्रात जाहिरात देऊन अर्ज मागविण्यात आले होते. शिष्यवृत्तीसाठी प्राप्त अर्जांचे अवलोकन केल्यानंतर केवळ कागदोपत्री प्राप्त प्रमाणपत्राच्या आधारे अर्जदारांमधून १२ विद्यार्थ्यांची शिष्यवृत्तीसाठी निवड करणे अशक्य असल्यामुळे अर्जांची छाननी करण्यासाठी प्रथम काही निकष निश्चित करणे आवश्यक असल्याचे दिसून आले. त्यानुसार शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थ्यांना पात्र ठरविण्यासंदर्भात गठीत करण्यात आलेल्या तज्ञ समितीसोबत दि. ९ जुलै, २०१३ रोजी बैठक आयोजित करुन निकष निश्चित करण्यासंदर्भात चर्चा करण्यात आली असून त्यानुसार अर्जांच्या छाननी संदर्भातील निकष निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-** विचारांती भारतरत्न पं. भीमसेन जोशी युवा शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांच्या अर्जाची छाननी करण्यासाठी सदर शासन निर्णयान्वये निकष निश्चित करण्यात येत आहेत.

१. विद्यार्थ्याचे वय कमाल २५ वर्षे इतके असावे.
२. गुरुकडे शिक्षण घेणा-या विद्यार्थ्याचे गुरुकडे किमान १० वर्षे शिकत असल्याचे शिफारसपत्र.

३. विद्यापीठात शिक्षण घेणा-या विद्यार्थ्याने विद्यापीठाची गुणपत्रिका अर्जासोबत जोडली आहे किंवा कसे या बाबत छाननी करणे.

४. विद्यार्थ्याच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु.६.०० लाख किंवा त्यापेक्षा कमी असणे आवश्यक आहे. सदर आर्थिक निकषाची मर्यादा ही राज्य शासनाने आरक्षण सोयी सवलतीकरीता उन्नत व प्रगत गट यांच्या उत्पन्न मर्यादेप्रमाणे ठरविण्यात आली असल्यामुळे यापुढे ज्या-ज्या वेळी राज्य शासनामार्फत उत्पन्न मर्यादेत वाढ केली जाईल, तीच उत्पन्न मर्यादा सदर शिष्यवृत्ती योजनेसाठी सुध्दा लागू राहणार आहे. यांसाठी अर्जासोबत प्राप्त कुटुंबाच्या उत्पन्नाच्या दाखल्याची सांक्षाकित प्रत जोडावी.

५. केंद्र शासनाची किंवा इतर संस्थेची शास्त्रीय संगीताच्या शिक्षणास्तव शिष्यवृत्ती मिळत असणारा विद्यार्थी या योजनेअंतर्गत शिष्यवृत्ती मिळण्यासाठी पात्र असणार नाही.

६. शिष्यवृत्तीद्वारे शास्त्रीय संगीताचे ज्ञान घेतल्यानंतर पुढे याच क्षेत्रात कार्यरत राहणे आवश्यक राहील.

७. अर्जाची छाननी करताना विकलांग विद्यार्थ्यांसाठी वरील सर्व अटी काही प्रमाणात शिथील करण्यात येतील.

८. वरील निकषानुसार अर्जांची छाननी करुन प्रथम गाळण पध्दतीने योग्य अर्ज पात्र ठरविण्यात येतील.

९. पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांच्या कलेच्या सादरीकरणाची सी.डी. निवड समितीच्या तज्ञ सदस्यांना ऐकविण्यात येऊन द्वितीय गाळणी नंतर योग्य विद्यार्थी शिष्यवृत्तीच्या चाचणी परिक्षेसाठी पात्र ठरविण्यात येतील.

१०. चाचणी परिक्षेसाठी पात्र ठरलेल्या सर्व विद्यार्थ्यांची तज्ञ समिती सदस्यांमार्फत प्रत्यक्ष चाचणी परिक्षा घेऊन त्यामधून १२ विद्यार्थ्यांची शिष्यवृत्तीसाठी अंतिमरित्या निवड करण्यात येईल.

११. या योजनेअंतर्गत १२ विद्यार्थ्यांची शिष्यवृत्तीसाठी निवड करण्याचे अंतिम अधिकार तज्ञ समितीस राहतील.

<u>**टिप :-**</u> १) ज्या १२ विद्यार्थ्यांची शिष्यवृत्तीसाठी निवड करण्यात येईल, असे विद्यार्थी २ वर्षाच्या शिक्षणानंतर पुढील २ वर्षे शासनाचे कार्यक्रम करतील, असा करारनामा विद्यार्थ्यांकडून घेण्यात यावा.

२) याप्रकरणी विद्यार्थ्यांमध्ये विशेष गुणवत्ता आढळल्यास इतर निकषांमध्ये शिथिलता आणण्याचे अधिकार तज्ञ समिती सदस्यांना देण्यात येत आहेत.

वरील प्रमाणे अर्जांच्या छाननीसाठी निकष निश्चित करण्यात आले असले तरी, चालू वर्षी अर्ज मागवितांना उपरोक्त निकष निश्चित करण्यात आले नसल्यामुळे यावर्षी छाननीसाठी आवश्यक कागदपत्रे विद्यार्थ्यांकडून सादर झालेली नाहीत. त्यामुळे फक्त यावर्षी प्राप्त अर्जांचा उपरोक्त निकष विचारात न घेता समिती सदस्यांनी सर्व

अर्जांची तज्ञ म्हणून छाननी करुन पात्र विद्यार्थ्यांकडून सीडी मागविण्यात यावी व त्या सीडीचे समिती सदस्यांनी अवलोकन करुन त्यामधून गाळणीपध्दतीने पात्र विद्यार्थ्यांची चाचणी परिक्षेअंती शिष्यवृत्तीसाठी निवड करावी.

मात्र, यापुढे सदर शासन निर्णयानुसार अर्जाची छाननी करावयाची असल्यामुळे शिष्यवृत्तीसाठी अर्ज मागविताना सांस्कृतिक कार्य संचालनालयाने छाननीसाठी आवश्यक असणा-या सर्व कागदपत्रांची मागणी जाहिरातीद्वारे करण्याची योग्य ती दक्षता घ्यावी.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,**

३१/१२

**( गीता रा. कुलकर्णी )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय,मुंबई
उप सचिव (विनिमय) वित्त विभाग, मंत्रालय,मुंबई
महालेखापाल (महाराष्ट्र १) (लेखा परिक्षा / लेखा व अनुज्ञेयता ) मुंबई
अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
निवड नस्ती, सां.का.४